## राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करता यावे या हेतून केंद्र शासनाने सन १९६१-६२ या वर्षापासून राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरु केलेली आहे. या शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाकडून अर्थसाहाय्य मिळते व प्रत्यक्षात शिष्यवृत्ती मंजूरी व प्रदानिकरणाचे काम उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ क़डून कार्यान्वित होते. या शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाकडून प्रत्येक वर्षी एकून ३८१७ इतके संच महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर केले जातात. या मंजूर संचामधून राज्यामधील सर्व महाराष्ट्र राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक शिकक्षण मंडळामार्फत वार्षिक परीक्षेस बसलेल्या एकूण विद्यार्थी संख्येनुसार राज्यातील सर्व मंडळ निहाय नवीन मंजुरीसाठी संच-संख्या, ही उच्च शिक्षण संचालक यांच्या मान्यतेने निर्धारित केली जाते.

या शिष्यवृत्तीकरिता विहित केलेले नियम व अटींचा तपशील खालीलप्रमाणे:

१) संच ३८१७
२) कार्यक्षेत्र सर्व विभागीय SSC व HSC मंडळे (आठ)
३) उत्पन्न मर्यादा रु. २५,००० /- वार्षिक
४) पात्रता अ) माध्यमिक परीक्षेत उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना संच संख्या निर्धारित केल्यानुसार अंतिमत: विद्यार्थी लक्षात घेऊन.

ब) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना शाखानिहाय निर्धारित केलेली संचसंख्या लक्षात घेऊन.
क) विद्यापीठीय स्तरावर पदवीच्या आधारे.

५) अभ्यासक्रमाचा तपशील शिष्यवृत्तीचे दर वसतिगृह दर
१. इ. ११वी व १२वीसाठी ६० /- द.म. १०० वसतिगृह
२) प्रथम पदव्युत्तर परीक्षा ६० /- द.म. १०० वसतिगृह
३) बी.एस्सी.,बी.कॉम.,बी.ए.,प्र.वर्ष, द्वि.वर्ष ९०/- द.म. १४० वसतिगृह
४) इंजिनिअरिंग, एमबीबीएस, बीडीएस १२०/- द.म. ३०० वसतिगृह
५) आर्किटेक्चर
६) एम.एस्सी., एम.कॉम., एम.ए. १२० /- द.म. ३०० वसतिगृह

वरील दराने राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. तसेच नूतनीकरणासाठी किमान ५०% गुण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या नूतनीकरणासाठी दरवर्षी वार्षिक प्रगती अहवाल व गुणपत्रिका त्या महाविद्यालयाक़डून मागविली जाते.

ज्या विद्यार्थ्यांचे अथवा पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २५,०००/- पेक्षा अधिक आहे. अशा विद्यार्थ्यांना रु.१०००/- व प्रमाणपत्र दिले जाते.